दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## सुविचार

मैत्री म्हणजे फक्त सोबत चालणे नव्हे, तर अडचणीच्या वाटेवर हात धरून उभे राहणे होय. सुखात हसणारे अनेक असतात, पण दुःखात साथ देणारा मित्रच ही खरी संपत्ती असते.

## कर्मचाऱ्यांचा पगार कापणार

**हैद्राबाद:** वृद्ध माता-पित्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांविरोधात तेलंगणा सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी जाहीर केले की, जे कर्मचारी आपल्या आई-वडिलांची काळजी घेणार नाहीत, त्यांच्या पगारातून १० टक्के रक्कम कपात करण्यात येईल. ती थेट संबंधित पीडित पालकांच्या खात्यात जमा केली जाईल.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १४ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - ११२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### मुख्यमंत्री नायडूंचा उत्सवात सहभाग

**नरावरीपल्ले (आंध्र प्रदेश) :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी मंगळवारी त्यांच्या कुटुंबासह त्यांच्या मूळ गावी, नरावरीपल्ले येथे संक्रांतीच्या उत्सवात भाग घेतला. या उत्सवात त्यांच्यासोबत त्यांची पत्नी नर भुवनेश्वरी, त्यांचा मुलगा-आयटी मंत्री नर लोकेश आणि सून हे उपस्थित होते. या उत्सवाचा एक भाग म्हणून, मुलांसाठी संगीत खुर्च्या, लिंबू-चमचा शर्यत आणि कोंबड्यांच्या झुंजीसह अनेक खेळांचे आयोजन करण्यात आले होते, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### बंगालमध्ये साठेबाजी विरोधात मोहीम

**कोलकाता :** जूट आयुक्त कार्यालयाने सांगितले की त्यांनी साठेबाजी आणि काळाबाजारावर कारवाईचा एक भाग म्हणून पश्चिम बंगालच्या अनेक जिल्ह्यांमधून सुमारे १०,००० क्विंटल कच्चा जूट जप्त केला आहे. काही व्यापारी, बेलर आणि स्टॉकिस्ट कृत्रिमरित्या किंमती वाढवण्यासाठी कच्च्या तागाची साठवणूक करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर, जूट आणि जूट टेक्सटाइल्स नियंत्रण आदेश, २०१६ अंतर्गत हे जप्ती करण्यात आल्या. मालदा, मुर्शिदाबाद, उत्तर २४ परगणा आणि नादिया जिल्ह्यांमधील १६ गोदामांमधून जप्त केलेले साठे जप्त करण्यात आले, असे एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

### गोवा कार्निव्हल उत्सव १४ फेब्रुवारीपासून

**पणजी :** गोवा कार्निव्हल, किनारी राज्यातील सर्वात उत्साही सांस्कृतिक कार्यक्रमांपैकी एक, पारंपारिकपणे राजा मोमो यांच्या नेतृत्वाखाली रंगीत मिरवणुका आणि फ्लोट परेडने चिन्हांकित, १४ फेब्रुवारी रोजी सुरू होईल. कार्निव्हल हा गोव्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे आणि उत्सवी भावनेचे प्रतीक आहे. पणजीजवळील पोरवोरिम येथे पारंपारिक कर्टन रायझरने उत्सवांची सुरुवात होईल.

## निवडणूक आयोगाच्या निर्णयाने प्रश्नचिन्ह; घरोघर प्रचारास मुभा

# मुंबईला आदर्श आजारसंहितेतून वगळले का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होत असून, १६ जानेवारीला मतमोजणी पार पडणार आहे. मतदानासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाच मुंबई निवडणूक विभागाने एक महत्त्वाचा आणि वादग्रस्त निर्णय घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. प्रचाराचा अधिकृत कालावधी संपल्यानंतरही उमेदवारांना घरोघरी जाऊन थेट प्रचार करण्याची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, राजकीय पक्षांमध्ये तीव्र चर्चेला उधाण आले आहे. मुंबईला आचारसंहितेतून वगळले का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचाराचा कालावधी १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. या वेळेनंतर कोणत्याही प्रकारचा प्रचार करण्यास मनाई असते. मात्र, याच दरम्यान राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना १५ जानेवारीपर्यंत घरोघरी भेट देत मतदारांशी संवाद साधण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे अधिकृत प्रचारबंदी लागू असतानाही प्रत्यक्षात प्रचार सुरू राहणार आहे.

ही परवानगी मुंबई महानगरपालिकेतील ए, बी आणि ई विभागांपुरती मर्यादित ठेवण्यात आली आहे. याबाबतचा उल्लेख नुकत्याच पार पडलेल्या राजकीय पक्ष व उमेदवारांच्या बैठकीच्या इतिवृत्तात करण्यात आला आहे. ही बैठक निवडणूक निर्णय अधिकारी कृष्णा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. बैठकीदरम्यान उमेदवारांना कोणत्या अटींच्या अधीन ही मुभा देण्यात येणार आहे, याचीही माहिती देण्यात आली.

या कालावधीत उमेदवारांना कोणत्याही प्रकारची पत्रके, फ्लायर्स, बॅनर किंवा अन्य प्रचार साहित्य वाटण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. केवळ मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, त्यांच्याशी चर्चा करणे आणि आपल्या भूमिका मांडणे एवढ्यापुरतीच मुभा देण्यात आली आहे. ध्वनिवर्धक, वाहनफेरी किंवा जाहीर प्रचाराला मात्र पूर्ण बंदी राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, राज्यात पहिल्यांदाच असा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे कोणत्याही निवडणुकीत मतदानाच्या किमान ४८ तास आधी प्रचार पूर्णपणे बंद केला जातो, जेणेकरून मतदारांवर कोणताही दबाव राहू नये आणि शांततेत मतदान प्रक्रिया पार पडावी. मात्र, यावेळी घेतलेल्या या निर्णयामुळे नियमांमध्ये शिथिलता आणली गेल्याचा आरोप काही राजकीय पक्षांकडून केला जात आहे.

या निर्णयामुळे निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेवर आणि समान संधीच्या तत्त्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आगामी काळात यावरून वाद आणि तक्रारी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्याचे संकेत दिले आहेत. मतदानाच्या तोंडावर

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र संसदेत कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा संसद भवनातील फोटो हटवावा, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावली. ही याचिका फालतू आणि निरर्थक असल्याचे स्पष्ट शब्दांत नमूद करत न्यायालयाने याचिकाकर्त्याला कठोर शब्दांत फटकारले.

याचिकाकर्त्याने संसद भवनात लावण्यात आलेल्या सावरकरांच्या छायाचित्रावर आक्षेप घेत तो हटवावा, अशी मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने अशा प्रकारच्या याचिकांमुळे मौल्यवान न्यायालयीन वेळ वाया जातो, असे निरीक्षण नोंदवले.

न्यायालयाने सांगितले की, संसद भवनातील छायाचित्रे ही ऐतिहासिक व राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्तींच्या योगदानाची आठवण म्हणून लावण्यात आलेली असतात. त्यावर राजकीय किंवा वैयक्तिक मतभेदांच्या आधारे आक्षेप घेणे योग्य नाही. कोणत्याही व्यक्तीच्या विचारांवर मतभेद असू शकतात; मात्र त्यासाठी न्यायालयाचा गैरवापर करता येणार नाही, असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला.

याचिकेत कोणताही ठोस कायदेशीर आधार नसल्याने ती फेटाळण्यात येत असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. भविष्यात अशा निराधार याचिका दाखल केल्यास दंडात्मक कारवाईचा इशाराही न्यायालयाने दिला आहे.

## अबू सालेमला दोन दिवसांचा पॅरोल मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी टोळीशी संबंधित कुख्यात आरोपी अबू सालेम याला दोन दिवसांचा आपत्कालीन पॅरोल देण्यास महाराष्ट्र सरकारने सहमती दर्शवली आहे. मात्र, त्याला हलवताना आणि पॅरोल कालावधीत कडक पोलीस एस्कॉर्ट (सुरक्षा बंदोबस्त) अनिवार्य राहील, असे राज्य सरकारने न्यायालयात स्पष्ट केले.

अबू सालेम सध्या मुंबईतील कारागृहात विविध गंभीर गुन्ह्यांप्रकरणी शिक्षा भोगत आहे. वैयक्तिक आणि आपत्कालीन कारणासाठी त्याने अल्पकालीन पॅरोलची मागणी केली होती. या अर्जावर सुनावणीदरम्यान राज्य सरकारने सुरक्षा बाबींवर भर देत, अबू सालेम हा आंतरराष्ट्रीय गुन्हेगार असल्याने कोणतीही ढिलाई देता येणार नाही, असे नमूद केले.

सरकारच्या वतीने सांगण्यात आले की, पॅरोल मंजूर असला तरी प्रत्येक हालचालीवर पोलिसांची नजर राहील. प्रवास, वास्तव्य आणि परतीचा मार्ग या सर्व टप्प्यांवर विशेष सुरक्षा तैनात करण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण होऊ नये किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी विशेष दक्षता घेण्यात येणार आहे.

दरम्यान, या निर्णयावर विविध प्रतिक्रिया उमटत असून, काही संघटनांनी सुरक्षेच्या मुद्द्यावर चिंता व्यक्त केली आहे.

कायदेपंडितांनी पॅरोल हा कैद्याचा कायदेशीर हक्क असला तरी सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत मांडले आहे.

## १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारीला मतदान

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांची अधिकृत घोषणा केली आहे. या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, ७ फेब्रुवारीला मतमोजणी व निकाल जाहीर केले जाणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापू लागले असून, सर्वच प्रमुख पक्ष तयारीला लागले आहेत.

या निवडणुकांमध्ये कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदांचा समावेश आहे. संबंधित जिल्ह्यांतील एकूण १२५ पंचायत समित्यांसाठीही एकाच टप्प्यात मतदान घेण्यात येणार आहे.

निवडणूक प्रक्रियेची सुरुवात १६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज भरण्याने होणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम मुदत २१ जानेवारी निश्चित करण्यात आली आहे. दाखल झालेल्या अर्जांची छाननी झाल्यानंतर उमेदवारांना २७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. त्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर केली जाणार आहे.

या निवडणुकीत प्रत्येक मतदाराला दोन मते देण्याची संधी मिळणार आहे. एक मत जिल्हा परिषदेच्या उमेदवारासाठी, तर दुसरे मत पंचायत समितीच्या उमेदवारासाठी देण्यात येणार आहे. मतदान प्रक्रिया पूर्णपणे ईव्हीएमद्वारे पार पडणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. मतदारांची सोय आणि सुरक्षितता लक्षात घेऊन अनेक ठिकाणी महिलांसाठी विशेष ‘पिंक’ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

या निवडणुकीतील एक महत्त्वाची बाब म्हणजे जात वैधता प्रमाणपत्राबाबत दिलेली सूट. सध्या ज्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही, असे उमेदवार अर्जासोबत प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडून निवडणूक लढवू शकतील. मात्र, निवडून आल्यानंतर ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहणार आहे. अन्यथा संबंधित सदस्यत्व रद्द होण्याची शक्यता असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यामुळे संबंधित जिल्ह्यांमध्ये प्रशासन सज्ज झाले असून, कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण आदी मुद्द्यांवर ही निवडणूक रंगणार असल्याचे चित्र आहे. अनेक ठिकाणी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये थेट लढती होण्याची शक्यता असून, स्थानिक राजकारणाला या निवडणुकीमुळे मोठी चालना मिळणार आहे.

## खासगी शाळांमध्ये गरीब विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची खात्री करा : सर्वोच्च न्यायालय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासन आणि स्थानीक प्रशासनाला दिले निर्देश नवी दिल्ली / वृत्तसंस्था समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना परिसरातील खासगी शाळांमध्ये प्रवेश नाकारला जाणार नाही, याची खात्री करणे ही राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासनांची जबाबदारी आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल मंगळवारी (दि.13) सर्वोच्च न्यायालयाने दिला. खासगी विनाअनुदानित शाळांनी 25 टक्के कोट्यातून गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य नसून, ते एक राष्ट्रीय मिशन मानले पाहिजे, असेही बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (आरटीई) कायदा, 2009 च्या कलम 12(1)(सी) चा अर्थ स्पष्ट करताना न्यायालयाने नमूद केले. लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, 2016 मध्ये पालकाने आपल्या मुलास 25 टक्के कोट्यातून प्रवेश मिळावा म्हणून मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र, ऑनलाइन प्रक्रियेत अर्ज केला नव्हता असे सांगत न्यायालयाने पालकांनाच जबाबदार धरत याचिका फेटाळली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिका पालकांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती ए.एस. चांदूरकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने शिक्षण हक्क कायदा 2009 मधील कलम 12(1)(क) चा अर्थ स्पष्ट करताना सांगितले की, खासगी शाळांनी पहिल्या इयत्तेत किंवा पूर्व-प्राथमिक वर्गांमध्ये किमान 25 टक्के जागा वंचित गटातील मुलांसाठी आरक्षित ठेवणे अनिवार्य आहे.

## लाडक्या बहिणींना दिलासा खात्यात पैसे जमा होऊ लागले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील महिलांसाठी राबवण्यात येत असलेल्या ‘लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या आदर्श आचारसंहितेमुळे या योजनेचा लाभ थांबेल, अशी शंका व्यक्त केली जात होती. मात्र, निवडणूक आयोगाने या योजनेचा नियमित मासिक हप्ता वितरित करण्यास हिरवा कंदील दिल्याने महिलावर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयानंतर संक्रांतीपूर्वीच लाभार्थी महिलांच्या खात्यात १,५०० रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.

राज्य सरकारकडून सुरू असलेल्या कल्याणकारी योजनांवर आचारसंहितेमुळे निर्बंध येऊ नयेत, यासाठी मुख्य सचिवांनी निवडणूक आयोगाला अहवाल सादर केला होता. याच्या आधारे आयोगाने सुरू असलेल्या योजनांचा नियमित लाभ देण्यास परवानगी दिली आहे. आचारसंहितेच्या कालावधीत अग्रिम स्वरूपात लाभ देणे किंवा ३,००० रुपये एकरकमी रक्कम वितरित करणे यास आयोगाने स्पष्ट मज्जाव केला होता. त्यामुळे डिसेंबर महिन्याचा नियमित हप्ता देण्यात आला आहे.

निवडणुकीदरम्यान मतदारांवर प्रभाव टाकला जाऊ नये, यासाठी आयोगाने नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, लाभात वाढ किंवा कोणत्याही स्वरूपाची नवीन घोषणा करण्यावर बंदी कायम ठेवली आहे.

## बिनविरोध उमेदवार आयोगाच्या रडारवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महापालिका निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार असताना, राज्यभरात ६० पेक्षा अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने वाद निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने प्रकरणाची चौकशी सुरू करत महत्त्वाचे अहवाल मागवले आहेत.

निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले की, प्रथम बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांनी इतर उमेदवारांवर कोणत्याही प्रकारचा दबाव आणला होता का, याची चौकशी केली जाईल. दुसरे म्हणजे, ज्या उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली, त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला होता का, किंवा त्यांना कोणतेही आमिष दाखवण्यात आले होते का, याची तपासणी होणार आहे. तिसऱ्या टप्प्यात, अशा प्रकारच्या दबावाबाबत पोलिसांत कोणतीही तक्रार दाखल झाली होती का, याची माहिती घेतली जाणार आहे. तसेच, चौथ्या मुद्द्यात इतर कोणत्याही तक्रारी किंवा हरकती प्राप्त झाल्या आहेत का, याचाही आढावा घेतला जाणार आहे. याशिवाय, माघार घेणाऱ्या उमेदवारांनी स्वेच्छेने आणि कोणत्याही दबावाशिवाय निर्णय घेतला होता का, याचीही चौकशी केली जाणार आहे. सर्व संबंधित महापालिका आयुक्तांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याचा अभ्यास करून पुढील योग्य ती कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून, १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. मात्र, या निवडणुकांमध्ये राज्यभरात ६० पेक्षा अधिक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

## ई-कॉमर्स क्षेत्रातील हस्तक्षेपानंतर ब्लिंकिटचा मोठा निर्णय

# ‘१० मिनिटांत डिलिव्हरी’ला सरकारचा ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** देशभरातील गिग आणि डिलिव्हरी कामगारांच्या संपाचा थेट परिणाम क्विक ई-कॉमर्स क्षेत्रावर झाला असून आता ग्राहकांना १० मिनिटांत डिलिव्हरी मिळण्याची सुविधा राहणार नाही. डिलिव्हरी कामगारांच्या सुरक्षिततेचा विचार करून सरकारने वेळेची ही मर्यादा हटवण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्तक्षेपानंतर क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म ब्लिंकिटने त्यांच्या सर्व ब्रँड्सकडून ‘१० मिनिटांच्या डिलिव्हरी’चा दावा काढून टाकला आहे.

दरम्यान, नववर्षाच्या पूर्वसंध्येला बहुतांश शहरांमध्ये डिलिव्हरी सेवा सुरू राहिल्या असल्या, तरी गिग कामगारांच्या प्रश्नांवरून सुरू झालेला वाद अद्याप संपलेला नाही. ‘१० मिनिटांत डिलिव्हरी’चा दावा मागे घेतल्यानंतर पुढील काळात कंपन्या कामगारांसाठी कोणते ठोस बदल करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्लिंकिट लवकरच आपल्या जाहिराती आणि प्रचारात्मक साहित्यातूनही १० मिनिटांच्या डिलिव्हरीचा उल्लेख पूर्णपणे हटवणार आहे. ब्लिंकिटनंतर झेप्टो, स्विगी आणि झोमॅटो यांसारख्या इतर क्विक कॉमर्स आणि फूड डिलिव्हरी कंपन्याही अशाच प्रकारचे निर्णय घेण्याची शक्यता आहे. केंद्रीय कामगार मंत्र्यांनी ब्लिंकिटसह झेप्टो, स्विगी आणि झोमॅटोच्या प्रतिनिधींशी बैठक घेत डिलिव्हरी कामगारांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कमी वेळेत डिलिव्हरी देण्याच्या जाहिरातींमुळे कामगारांवर अनावश्यक दबाव येतो आणि त्यामुळे अपघात व असुरक्षित कामाच्या पद्धती वाढू शकतात, अशी सरकारची भूमिका आहे. वाढत्या तक्रारी आणि गिग कामगार संघटनांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांनंतर हा हस्तक्षेप करण्यात आला.

गिग कामगार संघटनांनी कामाची असुरक्षित परिस्थिती, डिलिव्हरीचा अतार्किक दबाव, घटते उत्पन्न आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव याबाबत सातत्याने आवाज उठवला होता. २५ आणि ३१ डिसेंबर रोजी देशभरात गिग आणि डिलिव्हरी कामगारांनी संप पुकारत कंपन्यांच्या धोरणांचा निषेध केला होता. त्यांच्या मते, ‘१० मिनिटांत डिलिव्हरी’सारखी आश्वासने प्रत्यक्षात कामगारांच्या जीवाशी खेळ करणारी आहेत. सरकारी सूत्रांनी स्पष्ट केले आहे की ‘१० मिनिटांची डिलिव्हरी’ ही टॅगलाइन काढून टाकल्याचा अर्थ डिलिव्हरी सेवांचा वेग कमी होणार असा नाही. कंपन्या प्रत्यक्षात जलद सेवा देत राहतील, मात्र जाहिरात आणि प्रमोशनमध्ये ठरावीक वेळेचे अवास्तव आश्वासन देणे टाळले जाईल. यामुळे कामगारांवर धोकादायक पद्धतीने वेग वाढवण्याचा दबाव येणार नाही, असा सरकारचा विश्वास आहे.

तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय क्विक कॉमर्स क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा वळणबिंदू ठरू शकतो. आतापर्यंत प्रचंड स्पर्धेमुळे ‘सर्वात जलद डिलिव्हरी’ हीच कंपन्यांची ओळख बनली होती. मात्र आता कामगारांची सुरक्षितता, कामाची गुणवत्ता आणि नियामक जबाबदारी या मुद्द्यांना अधिक महत्त्व दिले जात असल्याचे चित्र दिसत आहे.

## तिरुपती लाडू प्रकरणी अधिकाऱ्याचा जामीन फेटाळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमरावती :** तिरुपती देवस्थानासाठी वापरण्यात येणाऱ्या लाडूंकरिता तूप पुरवठ्याचे टेंडर मंजूर करून देण्यासाठी लाच मागितल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या एका सरकारी अधिकाऱ्याचा जामीन अर्ज आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आरोपीस दिलासा देता येणार नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

तिरुपती बालाजी मंदिरात दररोज लाखो भाविकांना लाडू प्रसाद दिला जातो. त्यासाठी मोठ्या प्रमाणात तूप खरेदी करण्यात येते. संबंधित टेंडर मंजुरीसाठी आरोपी अधिकाऱ्याने एका ठेकेदाराकडून मोठ्या रकमेची लाच मागितल्याचा आरोप आहे. तक्रार प्राप्त होताच भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने सापळा रचत संबंधित अधिकाऱ्याला रंगेहात पकडले होते. जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने सांगितले की, सार्वजनिक श्रद्धेशी निगडित असलेल्या देवस्थानाच्या व्यवहारात भ्रष्टाचार होणे अत्यंत गंभीर बाब आहे. प्राथमिक तपासात आरोपीविरुद्ध ठोस पुरावे उपलब्ध असून, तपासावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता जामीन मंजूर करता येणार नाही.

या प्रकरणामुळे तिरुपती देवस्थानाच्या प्रशासनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संपूर्ण टेंडर प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी भाविक व सामाजिक संघटनांकडून होत आहे.

## संपादकीय

### इस्रोसमोर उभे राहिलेले प्रश्न

**इस्रोची सर्वाधिक विश्वासार्ह मानली जाणारी पीएसएलव्ही प्रक्षेपण प्रणाली सलग दोन वेळा अपयशी ठरल्याने अवकाश कार्यक्रमाबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. हा तांत्रिक अपघात नसून गुणवत्ता, व्यवस्थापन आणि भविष्यातील योजना यांचा पुनर्विचार करण्याची वेळ आल्याचे संकेत यातून मिळतात.**

इस्रोची पीएसएलव्ही मोहिम सलग दोन वेळा अपयशी ठरणे, याकडे निव्वळ तांत्रिक बिघाड म्हणून पाहून चालणार नाही. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या आजवरच्या उज्ज्वल कामगिरीच्या पार्श्वभूमीवर हे अपयश अधिक ठळकपणे जाणवते. आपल्या अभूतपूर्व कामगिरीने पीएसएलव्हीने भारताला जागतिक अवकाश नकाशावर विश्वासार्ह स्थान मिळवून दिले आहे. त्यामुळेच या घटनेकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. पीएसएलव्ही ही इस्रोची सर्वात विश्वासार्ह प्रक्षेपण प्रणाली मानली जाते. लहान आणि मध्यम वजनाचे उपग्रह अचूक कक्षेत पोहोचवण्याची त्याची क्षमता, तुलनेने त्यासाठी होणारा कमी खर्च आणि सातत्यपूर्ण यशस्वी कामगिरी यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्याला मागणी कायम आहे. आतापर्यंतच्या अनेक मोहिमांत त्याने भारतासोबतच इतर देशांचे उपग्रहही यशस्वीरीत्या अवकाशात नेले. अशा या विश्वासार्ह वाहनाचे सलग दोन अपयश हे स्वाभाविकच प्रश्न निर्माण करणारे ठरले आहे. या दोन्ही मोहिमांमध्ये तिसऱ्या टप्प्यात अडचण निर्माण झाल्याचे प्राथमिक निरीक्षण आहे. रॉकेटचा हा टप्पा वेग आणि स्थैर्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो. इथे चूक झाली, तर संपूर्ण मोहिम धोक्यात येते. एका वेळचा अपघात अपवाद मानता येईल, पण त्याच टप्प्यात पुन्हा अडचण येणे ही सिस्टीमिक समस्या असण्याची शक्यता दर्शवते. उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण, पुरवठा साखळीतील घटक किंवा तपासणी पद्धती यापैकी कुठे तरी त्रुटी राहिल्या असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अपयशाचे परिणाम केवळ इस्रोपुरते मर्यादित नाहीत. या मोहिमांमध्ये सरकारी, संरक्षणविषयक, तसेच खासगी आणि शैक्षणिक संस्थांचे उपग्रह सामील होते. अनेक नवोद्योगांसाठी हे उपग्रह त्यांच्या व्यवसायाचा कणा होते. एका प्रक्षेपणावर वर्षानुवर्षांचे संशोधन, कोट्यवधींची गुंतवणूक आणि भविष्यातील करार अवलंबून असतात. त्यामुळे उपग्रह कक्षेत पोहोचू न शकल्याने या संस्थांसमोर आर्थिक आणि तांत्रिक अडचणी उभ्या राहिल्या आहेत. जागतिक अवकाश बाजारपेठेत भारताने कमी खर्चात विश्वासार्ह प्रक्षेपण सेवा देणारा देश अशी प्रतिमा निर्माण केली होती. सलग अपयशांमुळे आंतरराष्ट्रीय ग्राहकांचा विश्वास डळमळीत होण्याची भीती आहे. विमा कंपन्या, परदेशी ग्राहक आणि भागीदार देश हे सर्व प्रक्षेपणाच्या यशस्वीतेकडे बारकाईने पाहतात. त्यामुळे इस्रोसाठी पुढील काही मोहिमा अधिक जबाबदारीच्या आणि कसोटीच्या ठरणार आहेत. रणनीतिक पातळीवरही या अपयशाचे परिणाम जाणवू शकतात. काही उपग्रह हे देशाच्या संरक्षण आणि निरीक्षण क्षमतेसाठी महत्त्वाचे असतात. अशा उपग्रहांचा वेळेत प्रक्षेपण न होणे म्हणजे माहिती संकलन, संवाद आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे अवकाश कार्यक्रम हा केवळ वैज्ञानिक किंवा व्यावसायिक विषय न राहता राष्ट्रीय सुरक्षेशी जोडलेला मुद्दा ठरतो. मात्र, इस्रोचा आजवरचा इतिहास पाहता अपयशातून उभे राहण्याची त्याची क्षमता अनेकदा सिद्ध झाली आहे. सुरुवातीच्या काळात अनेक अपयश झेलल्यानंतरच इस्रोने आजचे यश मिळवले. अपयशांचे विश्लेषण, कारणांचा सखोल अभ्यास आणि त्यातून सुधारणा ही इस्रोची ताकद राहिली आहे. त्यामुळेच सध्याचे अपयशही आत्मपरीक्षणाची संधी म्हणून पाहिले जावे. आता गरज आहे ती पारदर्शकतेची आणि ठोस कृतीची. अपयशामागील नेमकी कारणे शोधून त्यावर उपाययोजना करणे, गुणवत्ता नियंत्रण अधिक कडक करणे आणि पुढील मोहिमांपूर्वी सर्व प्रणालींची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच, केवळ एका प्रक्षेपण प्रणालीवर अवलंबून न राहता इतर पर्यायी वाहने आणि तंत्रज्ञान विकसित करण्यावरही भर देणे गरजेचे आहे. सलग दोन अपयश म्हणजे इस्रोला एक स्पष्ट इशारा आहे. या इशाऱ्याकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी योग्य पावले उचलली, तर इस्रो पुन्हा एकदा विश्वासार्हता सिद्ध करू शकेल.

# निमित्त जना नायक चित्रपटाचे!

**‘जना नायक’ या तमिळ चित्रपटाच्या प्रमाणनावरून निर्माण झालेला वाद प्रशासकीय पातळीवर मर्यादित राहिलेला नाही. राहुल गांधी यांनी उपस्थित केलेले आरोप हे अभिव्यक्ती स्वातंत्र्य, भाषिक अस्मिता आणि केंद्र-राज्य संबंध यांतील तणाव पुन्हा ऐरणीवर आणणारे ठरले आहेत.**




चित्रपट, संस्कृती आणि राजकारण यांचे नाते भारतात नेहमीच तणावपूर्व राहिले आहे. त्यात भाषिक अस्मिता आणि केंद्र-राज्य संबंधांची भर पडली की वाद अधिक तीव्र होतो. तमिळ अभिनेता विजय यांच्या ‘जना नायक’ या चित्रपटाच्या प्रदर्शनासंदर्भात निर्माण झालेला वाद आणि त्यावरून राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर केलेले आरोप हे त्याचेच ताजे उदाहरण आहे. हा वाद केवळ एका चित्रपटाच्या प्रमाणपत्रापुरता मर्यादित न राहता अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सांस्कृतिक ओळख आणि राजकीय हस्तक्षेप या व्यापक मुद्द्यांना हात घालणारा ठरतो. राहुल गांधी यांनी गुप्तचर विभाग आणि माहिती व प्रसारण मंत्रालयावर ‘जना नायक’ला अडथळे आणल्याचा आरोप करत याला तमिळ संस्कृतीवरचा हल्ला असे संबोधले. त्यांच्या मते, हा प्रकार केवळ प्रशासकीय प्रक्रियेचा भाग नसून भाषिक आणि सांस्कृतिक अस्मितेला दडपण्याचा प्रयत्न आहे. विशेषतः तमिळनाडूमध्ये सिनेमा हा केवळ करमणुकीचे साधन नसून सामाजिक आणि राजकीय अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम राहिले आहे. त्यामुळेच एखाद्या लोकप्रिय अभिनेत्याचा चित्रपट अडवला जातो, तेव्हा त्याचे पडसाद केवळ चित्रपटसृष्टीतच नव्हे तर राजकारणातही उमटतात. दुसरीकडे, केंद्र सरकार आणि संबंधित यंत्रणांची भूमिका वेगळी आहे. त्यांचा दावा आहे की चित्रपट प्रमाणनाची प्रक्रिया कायद्याच्या चौकटीतच सुरू आहे आणि त्यामागे कोणताही सांस्कृतिक किंवा राजकीय अजेंडा नाही. चित्रपटातील काही दृश्ये किंवा संवाद नियमांनुसार तपासले जातात आणि आवश्यक वाटल्यास बदल सुचवले जातात, एवढाच हा प्रकार असल्याचे अधिकृत स्पष्टीकरण आहे. मात्र अशा स्पष्टीकरणांवर विश्वास ठेवायचा की नाही, हा प्रश्न आधीच संशयाच्या छायेत गेलेल्या वातावरणात अधिक गुंतागुंतीचा बनतो. तमिळनाडूमध्ये भाषा आणि संस्कृतीचा प्रश्न अत्यंत संवेदनशील आहे. हिंदीविरोधी चळवळींपासून ते द्रविड राजकारणापर्यंत, तमिळ अस्मितेने राज्याच्या राजकारणाला दिशा दिली आहे. अशा पार्श्वभूमीवर केंद्र सरकारशी संबंधित कोणतीही कारवाई सहजच ‘हस्तक्षेप’ किंवा ‘दडपशाही’ म्हणून पाहिली जाते. राहुल गांधी यांचे आरोप याच भावनिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर अधिक परिणामकारक ठरतात. काँग्रेससाठीही हा मुद्दा केंद्राविरोधात आणि प्रादेशिक अस्मितेच्या बाजूने उभे राहण्याची संधी देणारा आहे. या वादातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत प्रश्न पुन्हा समोर येतो. भारतीय संविधान अभिव्यक्ती स्वातंत्र्य देत असले तरी त्यावर काही वाजवी निर्बंधही घालते. समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा हे निर्बंध राजकीय सोयीने किंवा दबावाखाली वापरले जात असल्याची भावना निर्माण होते. चित्रपटसृष्टीतील अनेकांना वाटते की गेल्या काही वर्षांत प्रमाणन प्रक्रिया अधिक कडक आणि अनिश्चित बनली आहे. काय चालेल आणि काय नाही, हे स्पष्ट न राहिल्यामुळे सर्जनशीलतेवर मर्यादा येत असल्याची तक्रार वाढत आहे. विजय यांसारखा लोकप्रिय अभिनेता या वादाच्या केंद्रस्थानी असणेही महत्त्वाचे आहे. तमिळनाडूमध्ये चित्रपट नायक हे अनेकदा सामाजिक आणि राजकीय प्रतीक मानले जातात. त्यांच्या चित्रपटांतील संवाद, भूमिका आणि संदेश हे प्रेक्षक केवळ कथानक म्हणून नव्हे तर सामाजिक भाष्य म्हणूनही घेतात. त्यामुळे ‘जना नायक’सारखा चित्रपट अडचणीत सापडला की तो सत्तेच्या टीकेचा आवाज दाबला जातो आहे, अशी भावना बळावते. मात्र, या सगळ्यात संयमाची गरज आहे.

प्रत्येक प्रमाणन प्रक्रियेला थेट सांस्कृतिक हल्ला ठरवणेही योग्य नाही, तसेच प्रत्येक आक्षेपाला केवळ कायदेशीर बाब म्हणून झटकून टाकणेही चुकीचे ठरेल. पारदर्शकता, स्पष्ट नियम आणि संवाद यांचा अभाव हा या वादाचा मूळ गाभा आहे. प्रमाणन मंडळाने नेमके कोणते आक्षेप घेतले, ते सार्वजनिकपणे आणि स्पष्टपणे मांडले गेले, तर गैरसमज कमी होऊ शकतात. ‘जना नायक’ प्रकरणाने हे पुन्हा अधोरेखित केले आहे की भारतासारख्या बहुभाषिक, बहुसांस्कृतिक देशात अभिव्यक्तीचे प्रश्न अत्यंत संवेदनशील असतात. केंद्र आणि राज्य सरकारांनी तसेच सांस्कृतिक संस्थांनी या संवेदनशीलतेची जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

सिनेमा हा समाजाचा आरसा असतो, पण तो आरसा झाकण्याचा किंवा मोडण्याचा प्रयत्न झाला, तर अस्वस्थता वाढते. अखेर हा वाद एका चित्रपटापुरता राहणार की तो अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या व्यापक चर्चेला चालना देणार, हे येणारा काळ ठरवेल. इतके मात्र नक्की की, अशा प्रकरणांत सत्ता, संस्कृती आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे हेच भारतीय लोकशाहीचे खरे वैशिष्ट्य ठरणार आहे.

# पुण्याच्या वाहतुकीला ऐतिहासिक कलाटणी

## येरवडा-कात्रज ५४ किमी भूमिगत जाळे; ५६ बोगदे, एलिव्हेटेड कॉरिडॉर महत्त्वाकांक्षी योजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**३२ हजार कोटींचा महत्त्वाकांक्षी आराखडा**

● पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी रिंगरोड व भूमिगत बोगदा प्रकल्पाला गती मिळाली असून, या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजे खर्च सुमारे ३२ हजार कोटी रुपये इतका आहे. हा निधी पूर्णतः राज्य सरकारकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. प्रकल्पाचे प्राथमिक डिझाइन व सविस्तर अहवाल पूर्ण झाला असून, मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील देण्यात आला आहे. या रिंगरोड व भूमिगत बोगद्याच्या पूर्णत्वानंतर पुणे शहरातील सुमारे ४० टक्के वाहतूक कोंडी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. विशेष तज्ज्ञांच्या मते, भूमिगत बोगद्यांमुळे मुख्य रस्त्यांवरील वाहनांचा ताण कमी होऊन वाहतुकीला गती मिळणार आहे. त्याचबरोबर वाहनांची सततची गर्दी कमी झाल्याने शहरातील वायू प्रदूषणातही लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे.

**पुणे** : पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय आणि प्रदूषण यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून राज्य सरकारने ऐतिहासिक अशा भूगर्भीय वाहतूक प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. येरवडा ते कात्रज दरम्यान उभारण्यात येणारा हा प्रकल्प केवळ एक बोगदा नसून, तब्बल ५४ किलोमीटरचे भूमिगत वाहतूक जाळे असून त्यामध्ये ५६ बोगद्यांचा समावेश असणार आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील उत्तर ते दक्षिण भाग जोडणारे हे भूमिगत जाळे जगताप डेअरी, सिंहगड रोड, पाषाण, कोथरूड, औंध, संगमवाडी, खडकी आदी प्रमुख भागांना जोडणार आहे. यामुळे सध्याच्या रस्त्यांवरील ताण लक्षणीयरीत्या कमी होणार असून, हे जाळे रिंगरोडशी जोडले जाणार असल्याने महामार्गाकडे जाणारी वाहतूकही सुलभ होणार आहे.

“पुण्यातील ३२ प्रमुख रस्त्यांवर वाहतूक दीड ते अडीच पट वाढली आहे. भूमिगत बोगद्यांमुळे वाहतूक सुधारेल, नागरिकांचा वेळ व इंधन वाचेल,” असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. याशिवाय शहरात २३ उड्डाणपूल बांधण्यात येणार असून त्यापैकी ८ पुलांची कामे सुरू आहेत. काही ठिकाणी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्यात येणार असून, त्यावरून मेट्रो किंवा वेगवान वाहतूक मार्ग असणार आहे.

या संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजे खर्च ३२ हजार कोटी रुपये असून निधी राज्य सरकारकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. प्रकल्पाचा प्राथमिक अहवाल आणि डिझाइन पूर्ण झाले असून मुख्यमंत्री कार्यालयाकडूनही हिरवा कंदील मिळाला आहे. रिंगरोड पूर्ण झाल्यानंतर शहरातील सुमारे ४० टक्के वाहतूक कोंडी कमी होईल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पुण्याची ओळख केवळ सांस्कृतिक राजधानी म्हणून नव्हे, तर आधुनिक आणि स्मार्ट वाहतूक व्यवस्थेचे आदर्श शहर म्हणून निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पिंपरीत मतदारांना प्रलोभन देण्याचा प्रयत्न उघड; १९ वॉशिंग मशीन जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची सांगता होण्यास अवघे काही तास शिल्लक असतानाच महापालिकेच्या भरारी पथकाने मोठी कारवाई करत रहाटणी परिसरातून १९ वॉशिंग मशीन जप्त केल्या आहेत. मतदारांना वाटप करण्याच्या उद्देशाने या मशीन आणल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सोमवारी (१२ जानेवारी) रात्री साडेदहाच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या एफएसटी भरारी पथकाने ही धडक कारवाई केली. भरारी पथकाचे प्रमुख राहुल निकम यांच्या नेतृत्वाखालील पथकाने रहाटणी येथील गणराज कॉलनी परिसरात छापा टाकला. तपासणीदरम्यान एका मोटारीत १९ वॉशिंग मशीन आढळून आल्या. या सर्व मशीन तात्काळ जप्त करण्यात आल्या असून याप्रकरणी काळेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र आचारसंहिता कक्ष कार्यरत आहे. शहरात ३४ भरारी पथके आणि ३४ एसएसटी पथके २४ तास नजर ठेवून आहेत.

दरम्यान, मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर वाण किंवा कोणत्याही वस्तूंचे वाटप करणे आचारसंहितेचा भंग ठरतो. मते मागण्यासाठी लाच देणे किंवा घेणे हा भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १७० नुसार गुन्हा असून त्यासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गजा मारणेला पुण्यात येण्याची परोवानगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ मतदानाचा हक्क बजावण्यासाठी उच्च न्यायालयाकडून दोन दिवसांची सशर्त मुभा**

**पुणे** : पुणे महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत आरोपी असलेल्या गजानन उर्फ गजा मारणेला उच्च न्यायालयाने गुरुवार व शुक्रवार असे दोन दिवस पुण्यात येण्याची परवानगी दिली आहे. पत्नी जयश्री मारणे या राष्ट्रवादी काँग्रेसकडून महापालिका निवडणूक लढवत असल्याने प्रचारात मदत करण्यासाठी व स्वतःचा मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रवेशबंदीची अट शिथिल करण्याची मागणी करण्यात आली होती.


कोथरूड येथील आयटी कर्मचाऱ्याला मारहाण केल्याप्रकरणी मारणे टोळीवर मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल असून, याप्रकरणी जामीन मंजूर करताना पुणे महापालिका हद्दीत प्रवेश न करण्याची अट घालण्यात आली होती. विशेष न्यायालयाने ही अट शिथिल करण्यास नकार दिल्यानंतर मारणेने उच्च न्यायालयात धाव घेतली. जामिनाच्या सर्व अटींचे पालन केल्याचा युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने दोन दिवसांची मुभा दिली.

दरम्यान, मारणेच्या हालचालींवर पोलिसांचे कडक लक्ष असून, निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास कठोर कारवाईचा इशारा पोलिस आयुक्तांनी दिला आहे.

# ‘टीईटी’ची अंतिम उत्तरसूची जाहीर; निकालाकडे उमेदवारांचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ अंतिम उत्तरसूचीनुसार निकाल लवकरच संकेतस्थळावर; पुढील आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत**



**पुणे** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेची (टीईटी) अंतिम उत्तरसूची जाहीर करण्यात आली आहे. अंतरिम उत्तरसूचीवर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अभ्यास करून ही अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आल्याने आता निकाल कधी जाहीर होणार, याकडे लाखो उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. परिषदेतर्फे २३ नोव्हेंबर २०२५ रोजी टीईटी परीक्षा घेण्यात आली होती. त्यानंतर १९ डिसेंबर २०२५ रोजी अंतरिम उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली होती. पेपर क्रमांक १ व २ मधील प्रश्न किंवा पर्यायी उत्तरांबाबत आक्षेप नोंदविण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. या कालावधीत प्राप्त झालेल्या लेखी निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची तयार करण्यात आली आहे. परीक्षा परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, आता या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही आक्षेप किंवा निवेदने स्वीकारली जाणार नाहीत. अंतिम उत्तरसूचीनुसार टीईटी परीक्षेचा निकाल यथावकाश महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. यंदा सर्वोच्च न्यायालयाच्या टीईटी अनिवार्यतेविषयक निर्णयानंतर परीक्षेसाठी उमेदवारांची नोंदणी लक्षणीय वाढली आहे. या परीक्षेसाठी एकूण ४ लाख ७५ हजार ६६९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ३ हजार ३३४ उमेदवारांनी पेपर १ साठी, तर २ लाख ७२ हजार ३३५ उमेदवारांनी पेपर २ साठी नोंदणी केली आहे. मराठी माध्यमातील उमेदवारांची संख्या सर्वाधिक असून, ३ लाख २७ हजार १३५ उमेदवारांनी मराठी माध्यमातून अर्ज केला आहे. दरम्यान, परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी बायोमेट्रिक, फेस रेकग्निशन, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सीसीटीव्ही अशा अत्याधुनिक उपाययोजना राबविण्यात आल्या. पुढील काळात आधार प्रमाणित पद्धत लागू करण्याचा आणि वर्षातून दोनदा टीईटी परीक्षा घेण्याचा विचार परीक्षा परिषद करत असल्याचेही सांगण्यात आले आहे.

# लोकशाही बळकट करण्यासाठी सफाई सेवकांचा मतदानाचा

## शपथ, पथनाट्य व मार्गदर्शनातून मतदान जनजागृतीचा प्रभावी उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मतदानाबाबत जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने निगडी सेक्टर २६ येथील डॉ. हेडगेवार भवन येथे सफाई सेवकांसाठी विशेष मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. शहराची स्वच्छता राखणारे सफाई सेवक या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून त्यांनी मतदानाची शपथ घेत लोकशाहीप्रती आपली कटिबद्धता व्यक्त केली.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पल्लवी घाडगे, महापालिकेच्या क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी निवेदिता घार्गे, अविनाश डोईफोडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक दत्तात्रय गणगे, आरोग्य निरीक्षक लक्ष्मण साळवे, विकास शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने सफाई सेवक व नागरिक उपस्थित होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी सांगितले की, स्वीप (SVEEP) अंतर्गत शहरात मतदान जनजागृतीसाठी विविध अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहेत. सफाई सेवकांसाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद समाधानकारक आहे. ज्या प्रकारे सफाई सेवक शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेतात, त्याचप्रमाणे लोकशाही सशक्त ठेवण्याची जबाबदारीही आपणा सर्वांची आहे. प्रत्येक नागरिकाने निर्भयपणे मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन त्यांनी केले.

उपजिल्हाधिकारी पल्लवी घाडगे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, लोकशाही टिकवण्यासाठी आणि बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा मतदानातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. समाजातील प्रत्येक घटकाचे मत महत्त्वाचे असून, सफाई सेवकांनी मतदानाची शपथ घेऊन दाखवलेली बांधिलकी प्रेरणादायी आहे. येत्या निवडणुकीत प्रत्येक सफाई सेवकाने आवर्जून मतदान करून लोकशाही सुदृढ करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

मतदान जनजागृतीसाठी कार्यक्रमात पथनाट्याचे सादरीकरण माणिक खटींग, नीलम वाघमारे, अनिकेत शिंदे व शिवप्रसाद पासलकर यांनी केले. या पथनाट्यातून मतदान न केल्यास होणारे दुष्परिणाम आणि प्रत्येक मताचे लोकशाहीतील महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. उपस्थितांवर या सादरीकरणाचा विशेष प्रभाव पडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. या उपक्रमामुळे सफाई सेवकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता वाढली असून, लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचा संदेश सर्वदूर पोहोचला आहे.

# म्हाडा पुणे मंडळाची ४१८६ घरांची सोडत पुन्हा लांबणीवर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**+ जिल्हा परिषद निवडणुकीच्या आचारसंहितेत अडकण्याची शक्यता**

**मुंबई** : म्हाडाच्या पुणे मंडळामार्फत काढण्यात येणाऱ्या ४१८६ घरांच्या सोडतीबाबत घरासाठी अर्ज केलेल्या नागरिकांच्या चिंतेत पुन्हा भर पडण्याची शक्यता आहे. पालिका निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर ही सोडत होईल, अशी अपेक्षा असतानाच आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या आचारसंहितेत ही सोडत अडकण्याची चिन्हे आहेत.

मंगळवारी दुपारी ४ वाजता राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद होणार असून, यामध्ये १२ जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यानंतर आचारसंहिता लागू होणार असून सुमारे महिनाभर ती अंमलात राहणार आहे. त्यामुळे पुणे मंडळाची सोडत पुन्हा पुढे ढकलली जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

पुणे मंडळाकडून २० टक्के सर्वसमावेशक योजना व १५ टक्के एकात्मिक योजनेंतर्गत एकूण ४१८६ घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत. या घरांसाठी सप्टेंबरमध्ये अर्जविक्री व स्वीकृती सुरू झाली होती. तांत्रिक अडचणींमुळे अर्ज प्रक्रियेस दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आणि सोडतही दोनदा पुढे ढकलली गेली. अखेर २ लाख १५ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले.

मात्र संगणकीय प्रणालीतील अडचणी आणि त्यानंतर लागलेल्या पालिका निवडणूक आचारसंहितेमुळे सोडत रखडली. अनेक अर्जदारांनी कर्ज, उसनवारी किंवा क्रेडिट कार्डद्वारे अनामत रक्कम भरल्याने ती रक्कम अडकून पडली आहे. त्यामुळे अर्जदारांमध्ये तीव्र नाराजी आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### डोक्यात घाव घालून एकाचा खून

**चाकण :** चाकणजवळील बिरदवडी (ता. खेड) येथे एका अज्ञात इसमाचा दगड व घातक हत्यारांनी डोक्यात व तोंडावर मारहाण करून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मृताची ओळख सायंकाळी उशिरापर्यंत पटलेली नव्हती. याप्रकरणी बिरदवडीचे पोलीस पाटील दिलीप पवार यांनी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. घटना रविवारी सायंकाळी पावणे पाचपूर्वी घडल्याचा अंदाज आहे. पोलिसांनी पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे.

### शासकीय कार्यालयाचे लाखोंचे नुकसान

**चाकण :** खेड तालुक्यातील चांडोली येथील पुणे–नाशिक महामार्गालगत असलेल्या राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या जिल्हा फळरोपवाटिकेत निलंबित कर्मचारी सचिन शशिकांत कांबळे (रा. कबाडवाडी, ता. जुन्नर) याने रविवारी दुपारी कार्यालयात घुसून कोयत्याने खिडक्यांच्या काचा फोडल्या व पाईपलाईनचे नुकसान केले. वनमजूर कैलास शिर्के यांनी माहिती दिल्यानंतर पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले. सुमारे दोन लाखांहून अधिक नुकसान झाले असून पुढील तपास सुरू आहे.

### तडीपारी आदेशाचे उल्लंघन; एकावर गुन्हा दाखल


**चाकण :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून एक वर्षासाठी तडीपार केलेल्या व्यक्तीने आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमाकांत शांताराम सोनवणे (वय ३०, रा. चिंबळी, ता. खेड) असे आरोपीचे नाव आहे. ही कारवाई चाकण मार्केट यार्ड येथील पीडब्ल्यूडी मैदान परिसरात करण्यात आली. याप्रकरणी गुन्हे शाखा युनिट तीनचे पोलीस हवालदार योगेश्वर कोळेकर यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे.

---

**वारंवार पाइपलाइन गळतीमुळे नागरिक त्रस्त; सकाळी ७ ते ९ नियमित पाणीपुरवठ्याची ठाम मागणी**

# अवसरी पाणीपुरवठा योजनेचा सावळा गोंधळ कधी संपणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी खुर्द :** (ता. आंबेगाव) अवसरी खुर्द गावातील नळ पाणीपुरवठा योजनेचा गोंधळ काही केल्या संपताना दिसत नसून, ग्रामपंचायतीच्या ढिसाळ नियोजनामुळे नागरिकांना सातत्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. मागील तीन दिवसांपासून मुख्य पाइपलाइनला झालेल्या गळतीमुळे तब्बल चार दिवसांनी रविवारी पाणीपुरवठा करण्यात आला. या प्रकारामुळे विशेषतः महिलांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, "अवसरी खुर्दचा पाणीपुरवठा सावळा गोंधळ कधी संपणार?" असा सवाल उपस्थित केला जात आहे.

पूर्व सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गावाला नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळावा यासाठी मागील १५ ते २० वर्षांच्या कालावधीत अडीच ते तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मात्र एवढा मोठा निधी खर्च होऊनही आज गावकऱ्यांना मूलभूत गरजेसाठी संघर्ष करावा लागत असल्याने ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वारंवार होणाऱ्या पाइपलाइन लिकेजमुळे नळ पाणीपुरवठा योजनेवर मोठा परिणाम होत असून, नागरिकांचा संयम सुटू लागला आहे.

अवसरी खुर्द हे आंबेगाव तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे मोठे गाव आहे. येथे शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालय असल्याने राज्यभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. अनेक विद्यार्थी खासगी वसतिगृहांमध्ये वास्तव्यास आहेत. त्यामुळे गावाची दैनंदिन पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. तरीदेखील गेल्या सुमारे १४ वर्षांपासून ग्रामपंचायतीकडून दिवसाआड आणि तेही केवळ अर्धा ते पाऊण तासच पाणीपुरवठा केला जात आहे. परिणामी तलाव ते गावठाण या सुमारे दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या भागात पाणी अपुरे पडत आहे.

सध्या भौरदरा पाझर तलावातून लोखंडी पाइपलाइनद्वारे गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र ही पाइपलाइन जुनी व कमकुवत झाल्याने वारंवार गळती होत आहे. मागील तीन दिवसांपासून याच गळतीमुळे पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला होता. पाइपलाइन दुरुस्तीसाठी तीन दिवस लागले आणि अखेर रविवारी पाणी आले. मात्र तोपर्यंत अनेक कुटुंबांची मोठी गैरसोय झाली. महिलांना पाणी विकत घ्यावे लागत असून, दररोज २५० ते ३०० रुपये खर्च करावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

या परिस्थितीमुळे अनेक महिलांना घरातील कामे, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन जबाबदाऱ्या सोडून पाण्यासाठीच थांबावे लागत आहे. टाक्या भरण्यासाठी पूर्वी तब्बल आठ तास जात असल्याने संपूर्ण दिवस पाण्याभोवतीच फिरतो, अशी व्यथा महिलांनी मांडली. "इतका निधी असूनही आम्हाला पाण्यासाठी भटकावे लागत असेल, तर याचा जबाबदार कोण?" असा थेट सवाल ग्रामपंचायतीला करण्यात आला आहे.

महिलांनी ग्रामपंचायतीकडे सकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत नियमित पाणीपुरवठा करण्याची ठाम मागणी केली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही त्यांनी दिला आहे. यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे.

दरम्यान, ग्रामविकास अधिकारी जगन्नाथ शिवोरे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, भौरदरा पाझर तलाव ते गावठाण दरम्यानच्या लोखंडी पाइपलाइनला गळती झाली होती. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला. सध्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून, पुढील काळात समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. टाक्या भरण्यासाठी पूर्वी साडेसात हॉर्स पॉवरची मोटार होती, ज्यामुळे सात ते आठ तास लागत होते. आता पंचरा हॉर्स पॉवरची नवीन मोटार बसवण्यात येणार असून, त्यामुळे पाणी भरण्याचा कालावधी कमी होईल, असा दावा त्यांनी केला. तरीही नागरिकांचा सवाल कायम आहे—"उपाययोजना केवळ कागदावर राहणार की प्रत्यक्षात अवसरी खुर्दला नियमित, पुरेसा आणि वेळेत पाणी मिळणार?" हे येणारा काळच ठरवेल. मात्र सध्या तरी अवसरीतील पाणीपुरवठा योजनेचा सावळा गोंधळ संपण्याची नागरिक आतुरतेने वाट पाहत आहेत.

---



मुख्यमंत्री पंचायतराज अभियानांतर्गत जवळे (ता. आंबेगाव) येथे दाखल झालेल्या पंचायतराज रथाचे ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ, शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी व मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात स्वागत करण्यात आले.

## जाधववाडी येथे बिबट्याचा तरुणावर हल्ल्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र



+ प्रसंगावधान आणि धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली; परिसरात भीतीचे वातावरण

**रांजणी :** जाधववाडी (ता. आंबेगाव) येथे मंगळवारी पहाटे बिबट्याने गाईच्या गोठ्यात एका तरुणावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. मात्र प्रसंगावधान राखत तरुणाने दाखवलेल्या धाडसामुळे मोठी दुर्घटना टळली असून या घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संतोष बबनराव जाधव (रा. जाधववाडी) हे मंगळवारी सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे गाईंचे दूध काढण्यासाठी घरालगत असलेल्या गोठ्यात गेले होते. त्यावेळी गोठ्यात अगोदरच दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक संतोष जाधव यांच्यावर झेप घेण्याचा प्रयत्न केला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे क्षणभर ते गोंधळून गेले; मात्र प्रसंगाचे गांभीर्य ओळखून त्यांनी स्वतःचे धैर्य न गमावता बिबट्याला प्रतिकार केला. गोठ्यातून मोठमोठ्याने आरडाओरडा करताच आणि प्रतिकार केल्याने बिबट्याने घाबरून तिथून पळ काढला. संतोष जाधव यांनी तत्काळ घरातील सदस्यांना उठवून घडलेला प्रकार सांगितला. सुदैवाने या घटनेत ते बिबट्याच्या हल्ल्यातून थोडक्यात बचावले असून कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे जाधववाडी व परिसरातील नागरिकांमध्ये मात्र प्रचंड घबराट पसरली आहे. संतोष जाधव यांच्या घरासह आजूबाजूच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. याबाबत स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे वारंवार तक्रारी करून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्याची मागणी केली होती. मात्र अद्यापही वन विभागाकडून ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## जिल्हा परिषद निवडणुकीत काय भूमिका घ्यायची? – अरुण गिरे यांचा संभ्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ राष्ट्रवादीकडून उमेदवारीचे संकेत नसल्याने जनतेत जाण्याचा निर्णय; अंतिम भूमिका मतदार ठरवणार

**मंचर :** आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता कमी असल्याचे स्पष्ट संकेत मिळत असल्याने, आता "सरेंडर व्हायचे की निवडणूक लढवायची" या दोनच भूमिका माझ्यापुढे असल्याचे स्पष्ट मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरुण गिरे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. उद्यापासून प्रत्यक्ष मतदारसंघात जाऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या मतांचा कौल जाणून घेऊन पुढील निर्णय घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अरुण गिरे म्हणाले की, राजकारणाच्या सुरुवातीपासूनच त्यांनी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांना निष्ठेने साथ दिली आहे. २०१४ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सोडून शिवसेनेत जाण्याची मानसिकता नव्हती. मात्र त्या काळात काही परिस्थिती आणि दबावामुळे वेगळे निर्णय घ्यावे लागले. माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी स्वतःच्या मुलाप्रमाणे जिव्हाळ्याने वागणूक दिली, विविध निवडणुकांत संधी दिली आणि लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये प्रामाणिकपणे काम करण्याची संधी मिळाली, असेही त्यांनी नमूद केले.

पारगाव-निरगुडसर जिल्हा परिषद गट यंदा सर्वसाधारण प्रवर्गात आल्याने पुन्हा एकदा संधी मिळेल अशी अपेक्षा होती. त्यासाठी मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर दौरे करून मतदारांचा पाठिंबा मिळवला. जनतेतून सकारात्मक प्रतिसाद मिळत असतानाही पक्षातून उमेदवारी मिळण्याचे संकेत मात्र दिसत नाहीत, अशी खंत गिरे यांनी व्यक्त केली. तब्बल ३५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत फक्त एकदाच जिल्हा परिषदेत संधी मिळाली, त्यामुळे यावेळी तरी विचार व्हावा अशी अपेक्षा होती, असेही त्यांनी सांगितले.

पक्षातील अंतर्गत वागणुकीबाबत बोलताना गिरे म्हणाले की, सध्या नवीन विकासकामांचे उद्‌घाटन, भूमिपूजन कार्यक्रमात त्यांना निमंत्रित केले जात नाही.

---

## चैतन्य विद्यालय ओतूरचा शासकीय चित्रकला परीक्षेत शंभर टक्के निकाल

**शर्वरी आरोटे राज्य गुणवत्ता यादीत ८१ वी; १४७ विद्यार्थ्यांचे दैदिप्यमान यश**

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**बनकारफाटा :** ग्राम विकास मंडळ, ओतूर संचलित चैतन्य विद्यालय, ओतूर येथील विद्यार्थ्यांनी शासकीय चित्रकला एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत विद्यालयाची विद्यार्थिनी शर्वरी राजेंद्र आरोटे हिने राज्य गुणवत्ता यादीत ८१ वे स्थान मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

या दोन्ही शासकीय चित्रकला परीक्षांसाठी चैतन्य विद्यालयातील एकूण १४७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २८ विद्यार्थ्यांना अ श्रेणी, ५१ विद्यार्थ्यांना ब श्रेणी, तर ६८ विद्यार्थ्यांना क श्रेणी प्राप्त झाली असल्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. शासकीय चित्रकला परीक्षा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ व कला संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घेतली जाते.

चैतन्य विद्यालय, ओतूर येथे शासकीय चित्रकला परीक्षेचे अधिकृत केंद्र असून, यावर्षी परिसरातील २० माध्यमिक शाळांमधील तब्बल ६४३ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे व त्यांना कलाक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविणे हा या परीक्षेचा मुख्य उद्देश आहे. सातत्यपूर्ण सराव, मेहनत व एकाग्रता यामुळेच हे यश मिळाल्याचे मत विद्यालयातील शिक्षकांनी व्यक्त केले. इंटरमिजिएट परीक्षेत अ श्रेणी मिळविणाऱ्यांमध्ये शर्वरी राजेंद्र आरोटे (राज्य गुणवत्ता यादीत ८१ वी), आदित्य संतोष फापाळे, अंजली योगेश खेत्री, अथर्व विठ्ठल कुटे, गार्गी राजेंद्र आरोटे, नंदिनी दीपक पाचपुते, नियती मनोज पटेल, पलक रामदास डोंगरे, श्रुती बाळू नलावडे व वरद चंद्रशेखर नलावडे यांचा समावेश आहे. एलिमेंटरी परीक्षेतही अनेक विद्यार्थ्यांनी अ श्रेणी मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशस्वी विद्यार्थ्यांना कलाशिक्षक संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले.

## मंचरमध्ये खत-औषध दुकान फोडणारे दोन चोरटे जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ मंचर पोलिसांची कारवाई; ८ लाख ११ हजारांचा मुद्देमाल जप्त

**मंचर :** मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पेठ येथे खत व औषधांच्या दुकानात चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना मंचर पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून तब्बल ८ लाख ११ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संतोष पोपट नलावडे (वय ३४, रा. नानेकरवाडी) आणि अमर संतोष नायक (वय १९, रा. खराबवाडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

मंचर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पेठ येथील किरण कैलास कुंदळे यांच्या सह्याद्री कृषी उद्योग या खत-औषध दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास चोरी केली होती. या चोरीत ३ लाख ११ हजार २०५ रुपयांची खते, औषधे व बियाणे चोरून नेण्यात आली होती.

चोरीचा माल विक्रीसाठी मंचर-सुलतानपूर रस्त्यावरील नवीन पुणे-नाशिक रस्त्याच्या पुलाखाली कार क्रमांक एमएच १५ डीएम ८१२७ मधून आणण्यात आल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली असता, दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी आरोपींकडून चोरीस वापरलेली कार तसेच चोरलेली खते, औषधे व बियाणे असा एकूण ८ लाख ११ हजार २०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बडगुजर, पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे, तसेच पोलीस कर्मचारी शेखर भोंइर, संजय नाडेकर, योगेश रोडे, अजित पवार, हनुमंत ढोबळे व सुनील काठे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या केली.

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बनकारफाटा :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खटकाळे येथे राजमाता जिजाबाई भोसले व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त बालसभेचे आयोजन सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ रोजी उत्साहात करण्यात आले. या बालसभेचे संपूर्ण नियोजन इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. सभेच्या अध्यक्षस्थानाची धुरा प्रतीक्षा वायाळ हिने समर्थपणे सांभाळली.

कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष व मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी "आम्ही जिजाऊंच्या मुली" या भावपूर्ण गीताचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. या गीतातून राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारशील मातृत्वाचा व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

बालसभेत प्राजक्ता भवारी, स्वराली मोडक, शर्वरी वायाळ, प्रतीक्षा वायाळ, आरुषी मोरे, अर्पिता गागरे, तेजस्विनी गागरे व आराध्या साबळे या विद्यार्थ्यांनी आपापल्या भाषणातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने मांडलेले विचार उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात विशेष रंगत आणली.

शाळेच्या मुख्याध्यापिका काशीद यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनातून आपण कोणती शिकवण घ्यावी, यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, धैर्य आणि राष्ट्रभक्ती रुजवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच शिक्षक मुंढे सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता सांगत विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष हिना शेख, सदस्य हिरा भवारी, पूजा मोडक तसेच अंगणवाडी सेविका व कार्यकर्त्या उपस्थित होत्या. बालकेंद्रित उपक्रमातून साजरी करण्यात आलेली ही जयंती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे मनापासून कौतुक केले.

---

## घोड नदी पात्रात मासेमारीला वेग; महिलांना मिळतोय हक्काचा रोजगार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ आंबेगाव तालुक्यातील आदिवासी महिलांचा आर्थिक स्वावलंबनाकडे ठाम प्रवास

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील घोड नदी पात्रात सध्या मासेमारीला मोठ्या प्रमाणावर वेग आला असून, याचा थेट लाभ स्थानिक मच्छीमार कुटुंबांना होत आहे. पावसाळ्यानंतर नदी पात्रात साठलेले पाणी, वाढलेली जलवनस्पती आणि अनुकूल हवामान यामुळे मासळीची संख्या वाढली आहे. विशेष म्हणजे या व्यवसायात आता महिलांचा सक्रिय सहभाग वाढत असून, मासेमारी त्यांच्यासाठी हक्काचा रोजगार ठरत आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील चांडोली, खडकी, पिंपळगाव, निरगुडसर, जवळे, भराडी, पारगाव, काठापुर आदी गावांना घोड नदीचे पात्र वरदान ठरले आहे. नदीकाठावर वास्तव्यास असलेल्या भिल्ल, ठाकर व कातकरी या आदिवासी समाजातील कुटुंबांतील महिलांनी मासेमारीकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहण्यास सुरुवात केली आहे. पारंपरिक साधनांच्या मदतीने मासे पकडणे, त्यांची स्वच्छता करणे, विक्रीसाठी तयार करणे अशी कामे महिला करत आहेत.

**राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

## गाडगे महाराज विद्यालयात जिजाऊ–विवेकानंद विचारांचा जागर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** गाडगे महाराज विद्यालय, ओतूर येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन करून विचारजागर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. तरुण पिढीमध्ये राष्ट्रभक्ती, चारित्र्य, आत्मविश्वास आणि कर्तव्यभावना रुजवण्यासाठी जिजाऊ–विवेकानंदांच्या विचारांचा वारसा जपणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन पाटील यांनी केले.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नितीन पाटील म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांच्या माध्यमातून आदर्श राष्ट्रनिर्मितीची बीजे रोवली, तर स्वामी विवेकानंदांनी तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि अध्यात्मिक शक्ती जागवली. या दोघांचे विचार आजच्या तरुणाईसाठी दीपस्तंभ ठरणारे आहेत. त्यांच्या विचारांचा जागर सातत्याने घडवणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमात श्लोक शेटे यांनी स्वामी विवेकानंदांचे कार्य आणि राजमाता जिजाऊ यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. "थोर महात्म्यांचे चरित्र पाहून आपणही त्यांच्यासारखे घडण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हाच आजचा खरा बोध आहे," असे ते म्हणाले.




विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. जानवी शेटे, सायली तांबे, आराध्या ठिकेकर, काव्य अहिनवे, तेजस्विनी डुंबरे, रुचिता भोकरे, आराध्या भळगट आणि सिद्धी भुजबळ या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. अनेक विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंदांचे विचार इंग्रजी भाषेत मांडून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'मी जिजाऊ बोलते' या विषयावर राजमाता जिजाऊ यांच्या वेशात श्वेता पानसरी यांनी सादर केलेले प्रभावी मनोगत. जयंती आणि पुण्यतिथी साजरी करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी तरुण पिढी व आजच्या समाजव्यवस्थेवर परखड विचार मांडले. "राजमाता जिजाऊंच्या संस्कारातून घडलेले शिवराय हेच आदर्श नेतृत्वाचे प्रतीक आहे," असा संदेश त्यांनी दिला. विचारमंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने, पर्यवेक्षक कैलास महाजन, ज्येष्ठ शिक्षक प्रदीप कुमार मिरगे, सुनील पोकळे, धीरज कुमार सोनवणे, तुषार पानसरे, संजय मेटकरी, शिक्षक प्रतिनिधी मनीषा ठाकरे, भानुदास ढोबळे तसेच माता-पालक प्रतिनिधी रूपाली भुजबळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र अहिनवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शोभा तांबे यांनी मानले. प्रेरणादायी विचार, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि सामाजिक भान जागवणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवून गेला.

## सारांश वृत्त

### कठुआत घुमले गोळीबाराचे आवाज

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम गावात दहशतवाद्यांच्या संशयास्पद हालचालींबद्दल माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी मंगळवारी शोध मोहीम सुरू केल्यानंतर अनेक गोळीबाराचे आवाज ऐकू आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ७ जानेवारी रोजी सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांशी गोळीबार केला होता, त्या काहोग वनपट्ट्यातील कामध नाल्यापासून सुमारे १० किमी अंतरावर असलेल्या बिल्लावरच्या नजोटे वनक्षेत्रातून अधूनमधून गोळीबार सुरू होता. त्यांनी सांगितले की, संशयित दहशतवाद्यांनी सैन्याच्या हालचाली पाहून काही गोळ्या झाडल्या, परंतु त्यांना निष्क्रिय करण्यासाठी जंगलात खोलवर जाताना त्यांनी प्रत्युत्तर दिले.

### माजी माकप आमदार काँग्रेसमध्ये दाखल

**तिरुवनंतपुरम :** वरिष्ठ सीपीआय(एम) नेत्या आयशा पॉटी मंगळवारी विरोधी काँग्रेसमध्ये सामील झाल्या आणि डाव्या पक्षाशी असलेल्या त्यांच्या दशकाहून अधिक काळाच्या संबंधाचा शेवट केला. कोट्टारक्कारा मतदारसंघाचे सलग तीन वेळा प्रतिनिधित्व करणारे पॉटी यांनी येथील लोकभवनासमोर पक्षाने आयोजित केलेल्या दिवसरात्र निषेधाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर औपचारिकपणे काँग्रेस सदस्यत्व स्वीकारले.

### पुद्दुचेरी सरकारची ३ हजारांची पोंगल भेट

**पुदुच्चेरी :** पुदुच्चेरी सरकारने मंगळवारी सांगितले की ते सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत येणाऱ्या ३.४७ लाख कुटुंबांना तात्काळ ३,००० रुपयांची पोंगल भेट देईल. मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांनी नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार विभागाला थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. पीडीएस कार्डधारकांना रेशन दुकानांमधून ७५० रुपयांच्या पोंगल वस्तूंच्या पॅकेजच्या मोफत वाटपाव्यतिरिक्त ही रोख मदत देण्यात आली आहे, असेही त्यात म्हटले आहे.

## शत्रूच्या कोणत्याही कृतीला कठोर प्रत्युत्तर दिले जाईल

# ऑपरेशन सिंदूर सुरूच; पाकला इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूर अद्याप सुरू असून शत्रूकडून होणाऱ्या कोणत्याही चुकीच्या किंवा आक्रमक कृतीला भारतीय लष्कर प्रभावी आणि कठोर प्रत्युत्तर देईल, असा स्पष्ट इशारा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी पाकिस्तानला दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना जनरल द्विवेदी म्हणाले की, चीनसोबतच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर सध्या परिस्थिती स्थिर आहे, मात्र त्यासाठी सातत्याने सतर्क राहणे आवश्यक आहे. उत्तर सीमेवर शांतता असली तरी कोणत्याही घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ऑपरेशन सिंदूरबाबत माहिती देताना लष्करप्रमुखांनी सांगितले की, भारतीय सैन्याने दहशतवादी पायाभूत सुविधांवर खोलवर अचूक हल्ले करून त्यांना मोठा धक्का दिला आहे. या कारवाईमुळे इस्लामाबादकडून सातत्याने केली जाणारी अण्वस्त्रांबाबतची धमकावणारी भाषा निष्प्रभ ठरली असून, प्रादेशिक सुरक्षेबाबतची धोरणात्मक गृहीतके पुन्हा अधोरेखित झाली आहेत.

ऑपरेशन सिंदूर ही सीमापार दहशतवादाला दिलेली ठोस आणि विचारपूर्वक प्रतिक्रिया असून त्यामध्ये तयारी, अचूकता आणि धोरणात्मक स्पष्टता दिसून येते, असेही त्यांनी नमूद केले. भारतीय लष्कराने आवश्यक त्या ठिकाणी सैन्य एकत्रित केले असून, गरज भासल्यास जमिनीवरील कारवाईसाठीही पूर्ण तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

पाकिस्तान तसेच पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये अजूनही आठ दहशतवादी कॅम्प सक्रिय असल्याची माहिती लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी दिली.

ते म्हणाले, "जवळपास आठ दहशतवादी कॅम्प अजूनही सक्रिय आहेत. त्यापैकी दोन कॅम्प आंतरराष्ट्रीय सीमेलगत आहेत. तर सहा दहशतवादी कॅम्प भारत - पाकिस्तान नियंत्रण रेषेवर सक्रिय आहेत. त्या कॅम्पमध्ये दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते, अशी शंका आम्हाला आहे. आम्ही त्यांची माहिती गोळा करत आहोत. शंकास्पद हालचाली आढळून आल्यास आवश्यक ती कारवाई आम्ही करू." असा इशारा द्विवेदी यांनी पाकिस्तानला दिला आहे.

उत्तर आघाडीवरील परिस्थितीबाबत बोलताना जनरल द्विवेदी म्हणाले की, परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे, मात्र निष्काळजीपणा परवडणारा नाही. नवीन संवाद व्यवस्था आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या उपायांमुळे हळूहळू स्थिती सामान्य होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्याचवेळी, लष्करी क्षमता वाढवणे आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे काम संपूर्ण सरकारच्या दृष्टिकोनातून वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यामध्ये रस्ते, दळणवळण व्यवस्था आणि तांत्रिक साधनसामग्री यांचा समावेश आहे.

जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती अजूनही संवेदनशील असल्याचे मान्य करतानाच, ती पूर्णपणे नियंत्रणात असल्याचे लष्करप्रमुखांनी सांगितले. कोणत्याही आव्हानाला तोंड देण्यासाठी भारतीय सैन्य सज्ज असून देशाच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम संदेश त्यांनी दिला.

## एनआयएने हाती घेतले घुसखोरांचे प्रकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) ने दिल्लीतर्फे हाती घेतलेल्या बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरी प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. पूर्वी हे प्रकरण दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाच्या अखत्यारीत होते.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, गेल्या आठवड्यात हा प्रकरण पोलिसांकडून एनआयएकडे हस्तांतरित करण्यात आले असून त्यानंतर तपास सुरू झाला आहे. या प्रकरणात एजन्सीने नवीन एफआयआर देखील नोंदवला आहे. गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार बेकायदेशीर स्थलांतर करणाऱ्या नेटवर्क्सवर कठोर कारवाई करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

दिल्ली पोलिसांनी राष्ट्रीय राजधानीत बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांविरोधात मोठी कारवाई करत दोन एफआयआर नोंदवल्या होत्या. या तपासात भारतात बेकायदेशीर प्रवेशाचे मार्ग, बनावट ओळखपत्र तयार करणारे सिंडिकेट, घुसखोरांना निवास आणि रोजगार देणारे एजंट यांसह अनेक महत्वाचे पैलू उघडकीस आले.

एनआयएकडे ताबा मिळाल्यानंतर तपासाची व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढली आहे. आता एजन्सी संपूर्ण सिंडिकेटचा शोध घेण्यास, निधी आणि आर्थिक व्यवहार तपासण्यास, आंतरराज्य आणि सीमापार संबंध उघड करण्यास लक्ष केंद्रित करत आहे. अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण फक्त दिल्लीपुरते मर्यादित नाही तर त्याचे आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध असण्याची शक्यता आहे.

गृह मंत्रालयाच्या दबावाखाली घेतलेले हे पाऊल महत्त्वाचे मानले जात आहे, कारण अशा बेकायदेशीर नेटवर्कमुळे केवळ कायदा व सुव्यवस्था धोक्यात येत नाही, तर संभाव्य दहशतवादी किंवा राष्ट्रीय सुरक्षा धोके देखील निर्माण होऊ शकतात. एनआयएच्या तपासातून घुसखोरी रॅकेटमागील व्यापक कट उघड होण्याची अपेक्षा आहे.

## बिहारमध्ये गुन्हेगार होताहेत फरार

### एसटीएफच्या कारवाईला मोठे यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये एका काळी दहशत पसरवणारे गुन्हेगार आता मोठ्या प्रमाणावर फरार झाले आहेत किंवा कायदेशीर कारवाईला सामोरे जात आहेत. बिहार सरकारच्या कठोर भूमिकेमुळे आणि दशकांपासून कायम असलेल्या अराजकतेला संपुष्टात आणण्याच्या निश्चयामुळे शक्य झाले आहे.


तेथील जनता आता डीजीपी विनय कुमार आणि डीजी (एसटीएफ) कुंदन कृष्णन या दोन कणखर पोलिस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एसटीएफने गुन्हेगार आणि नक्षलवाद्यांना पोलिसांसमोर येण्यास भाग पाडले असल्याचे मानतात. विशेष कार्य दलाने २०२५ मध्ये ३० चकमकी केल्या, ज्यात तीन कट्टर नक्षलवाद्यांचा समावेश होता आणि त्यांना अटक किंवा निष्क्रिय करण्यात आले. एसटीएफच्या कारवाईत सहा प्रमुख गुन्हेगार ठार झाले, ज्यात पाच बक्षीसधारक आणि दोन नक्षलवादी होते. याशिवाय, तीन कट्टर नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले, तर १३४ जणांना अटक झाली. डीजी कुंदन कृष्णन यांनी सांगितले की, डीजीपी विनय कुमार यांच्या कडक निर्देशांनुसार २०२५ मध्ये एसटीएफने १४३ बक्षीसधारकांसह एकूण १६८२ गुन्हेगारांना अटक केली.

या कारवाईत चार एके-४७, चार इन्सास रायफल्स, २२ लहान बंदुकींचे कारखाने, ५२२ देशी बनावटीच्या बंदुका आणि १५,५७७ पेक्षा जास्त जिवंत काडतुसे जप्त केले गेले.

एसटीएफने ३,८८३ किलो अंमली पदार्थ जप्त केले, ज्यात ६ किलो हेरॉइन आणि ३४ किलोपेक्षा जास्त चरसचा समावेश होता. गुन्हेगारांविरुद्धची ही कारवाई गुप्त माहितीवर आधारित होती आणि यामुळे संघटित गुन्हेगारीवर मोठा धक्काही बसला आहे.

## राजधानी दिल्लीसह उत्तर भारतात कडाक्याची थंडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** दिल्लीमध्ये मंगळवारी जानेवारी महिन्यातील गेल्या तीन वर्षांतील सर्वात थंड सकाळ नोंदवली गेली. किमान तापमान थेट ३ अंश सेल्सिअसपर्यंत घसरल्याची माहिती हवामानशास्त्र विभागाने दिली. राजधानीत यापूर्वी १६ जानेवारी २०२३ रोजी किमान तापमान १.४ अंश सेल्सिअसपर्यंत खाली गेले होते.

दिल्लीचे मुख्य हवामान केंद्र मानल्या जाणाऱ्या सफदरजंग येथे किमान तापमान ३ अंश सेल्सिअस नोंदवले गेले, जे सरासरीपेक्षा सुमारे ४.४ अंशांनी कमी आहे. पालम येथे ४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले, तर लोधी रोड परिसरात किमान तापमान ३ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे सरासरीपेक्षा तीन अंशांनी कमी आहे.

हवामान विभागाच्या मते, किमान तापमान सामान्यपेक्षा ४.५ ते ६.४ अंशांनी खाली गेल्यास शीतलहरीची स्थिती जाहीर केली जाते. दिल्लीमध्ये मंगळवारी अनुभवलेली थंडी या निकषांच्या जवळ जाणारी असल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. बुधवारीही राजधानीत थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे.

दिल्लीतील हवेच्या गुणवत्तेनेही चिंता वाढवली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आकडेवारीनुसार, मंगळवारी हवा गुणवत्ता निर्देशांक ३३७ नोंदवला गेला, जो 'अत्यंत खराब' श्रेणीत मोडतो. शहरातील २९ निरीक्षण केंद्रांवर हवेची गुणवत्ता 'अत्यंत खराब' नोंदवली गेली, तर नऊ केंद्रांवर 'खराब' आणि एका ठिकाणी 'गंभीर' श्रेणी गाठली. सोमवारी दिल्लीच्या अनेक भागांमध्ये हंगामातील सर्वात कमी तापमान नोंदवले गेले होते. त्यानंतर मंगळवारी थंडीची लाट अधिक तीव्र झाली.

दिल्लीप्रमाणेच पंजाब आणि हरियाणामध्येही कडाक्याच्या थंडीचा जोर कायम राहिला. चंदीगडमध्ये या हंगामातील सर्वात थंड रात्र अनुभवली गेली. किमान तापमान २.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. हे गेल्या नऊ वर्षांतील सर्वात कमी तापमान आहे.

## दिल्ली विमानतळ सहा दिवस बंद राहणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** हवाई प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत आहे. या महिन्यात दिल्ली विमानतळ तब्बल सहा दिवसांसाठी बंद राहणार आहे. केंद्र सरकारने २१ जानेवारी ते २६ जानेवारी पर्यंत दिल्लीचे हवाई क्षेत्र बंद ठेवण्याचा आदेश देत एअरमेनला नोटीस जारी केली आहे. २०२६ मध्ये होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन करून हा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली विमानतळावरील विमान वाहतूक सुमारे सहा दिवसांसाठी विस्कळीत होऊ शकते, ज्यामुळे प्रवाशांना त्रास होऊ शकतो.

आज केंद्र सरकारने दिल्ली विमानतळासाठी एअरमेनला नोटीस जारी केली, ज्यामध्ये असे म्हटले आहे की २१ जानेवारीपासून पुढील सहा दिवसांसाठी दिल्ली विमानतळ बंद राहील. सुमारे १०:२० ते १२:४५ तासांपर्यंत उड्डाणे विस्कळीत राहतील आणि हवाई संपर्क प्रभावित होतील. यामुळे विमान कंपन्यांचे नुकसान होईल आणि प्रवाशांना उड्डाण रद्द करावे लागतील. प्रवाशांना सरकारच्या निर्णयाचा आदर करण्याचे आणि विमान कंपन्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीचे हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी दिल्ली सहा दिवसांचे रिहर्सल करणार आहे. फ्लायपास्ट, मार्चपास्ट आणि सांस्कृतिक प्रदर्शनांसाठी रिहर्सल होतील. लष्करी उपकरणांच्या प्रदर्शनासाठी रिहर्सल देखील होतील. त्यामुळे, दिल्लीचे हवाई क्षेत्र बंद राहील, ज्यामुळे सुमारे ६०० उड्डाणांवर परिणाम होईल. विमान कंपन्यांना उड्डाण रद्द करणे, वेळापत्रक बदलणे आणि परतफेड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लोक त्यांच्या सोयीनुसार योग्य पर्याय निवडू शकतात.

## तरतुदीच्या वैधतेची सुनावणी खंडपीठाकडे

# भ्रष्टाचारावर विभाजित निकाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये सार्वजनिक अधिकाऱ्यांविरोधात चौकशी सुरू करण्यापूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करणाऱ्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील २०१८ च्या तरतुदीच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालयाने विभाजित निकाल दिला. आता हा वाद खंडपीठाकडे जाणार आहे. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने सेंटर फॉर पब्लिक इंटरेस्ट लिटिगेशनने दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय दिला. या याचिकेत भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मध्ये २०१८ साली समाविष्ट करण्यात आलेल्या कलम १७अ च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यात आले होते.

न्यायमूर्ती नागरत्न यांनी कलम १७अ असंवैधानिक असल्याचे स्पष्ट मत नोंदवले. ही तरतूद भ्रष्ट अधिकाऱ्यांना संरक्षण देणारी असून चौकशी प्रक्रियेला अडथळा आणणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. तपास सुरू करण्यासाठी पूर्वपरवानगी घेण्याची अट ही कायद्याच्या मूळ उद्देशाच्या विरोधात असून ती प्रामाणिक अधिकाऱ्यांचे नव्हे, तर भ्रष्टाचार करणाऱ्यांचे संरक्षण करते, असे त्यांनी निरीक्षण नोंदवले. यापूर्वी विनीत नारायण आणि सुब्रमण्यम स्वामी प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेल्या तरतुदी पुन्हा लागू करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

दुसरीकडे, न्यायमूर्ती विश्वनाथन यांनी कलम १७अ ला सशर्त वैधता दिली. त्यांनी म्हटले की, तपासासाठी परवानगी देण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाकडे न राहता स्वतंत्र संस्थेकडे असावा. त्यामुळे केंद्र सरकारच्या प्रकरणांत लोकपाल आणि राज्यांमध्ये लोकायुक्त यांनी ही मंजुरी द्यावी, अशा प्रकारे कलम १७अ वाचून दाखवावे, असे त्यांनी निर्देश दिले. या स्वरूपात ही तरतूद घटनात्मकदृष्ट्या वैध ठरू शकते, असे त्यांचे मत होते. प्रामाणिक सरकारी कर्मचाऱ्यांना दुर्भावनापूर्ण चौकशींपासून संरक्षण न दिल्यास धोरणात्मक पक्षाघात होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षांचे सविस्तर युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर ६ ऑगस्ट रोजी निकाल राखून ठेवला होता. विभाजित निकालामुळे हे प्रकरण आता मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्यासमोर मांडले जाईल. ते या प्रकरणाच्या अंतिम निर्णयासाठी मोठ्या खंडपीठाची स्थापना करतील.

सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्या सीपीआयएलतर्फे वकील प्रशांत भूषण यांनी युक्तिवाद केला होता की तपासासाठी पूर्वपरवानगीची अट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी रद्द केलेली संरक्षणात्मक व्यवस्था पुन्हा लागू करण्याचा प्रयत्न आहे. कलम १७अ मध्ये कार्यकारी मंडळाला, तसेच निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या मंत्र्यांना तपास सुरू करायचा की नाही हे ठरवण्याचा अधिकार दिला असल्याने हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होतो, असा दावा त्यांनी केला होता. या निकालामुळे भ्रष्टाचारविरोधी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत आणि तपास यंत्रणांच्या स्वायत्ततेबाबतची चर्चा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आली आहे.

## कुत्रा चावल्यास राज्यांना भरावा लागेल दंड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भटक्या कुत्र्यांशी संबंधित एका खटल्याची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने आज केंद्र आणि राज्य सरकारांना इशारा दिला आहे. कुत्र्यांच्या चाव्यामुळे आणि मृत्यूच्या प्रत्येक घटनेसाठी राज्य सरकारकडून मोठी भरपाई आकारली जाऊ शकते. तसेच न्यायालयाने असेही म्हटले आहे की, कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांनाही यासाठी जबाबदार धरले पाहिजे, कारण कुत्र्यांच्या चाव्याचे परिणाम आयुष्यभर राहतात, असे म्हणत खाऊ घालणाऱ्यांना फटकारले आहे.

न्या. विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली. सुनावणी दरम्यान, न्यायालयाने, कुत्र्यांना चावणाऱ्या प्रत्येक मृत्यूसाठी, आवश्यक व्यवस्था करण्यात अयशस्वी झालेल्या राज्यांना आम्ही दंड आकारू. शिवाय, कुत्र्यांना खायला घालणाऱ्यांनाही जबाबदार धरले जाईल. तुम्ही त्यांना घरी घेऊन जावे आणि तिथे ठेवावे. त्यांना फिरण्याची, चावण्याची आणि पाठलाग करण्याची परवानगी का द्यावी? असे म्हणत खडे बोल सुनावले आहेत.

कुत्र्यांना खाऊ घालणाऱ्यांच्या भावना फक्त कुत्र्यांबद्दल आहेत, मानवांबद्दल नाहीत. ९ वर्षांच्या मुलीला भटक्या कुत्र्यांनी चव घेऊन ठार केले तर कोणाला जबाबदार धरावे. कुत्र्यांना उघड्यावर खायला घालण्याची वकिली करणाऱ्या संघटनेला जबाबदार धरले जाऊ नये का? असा सवाल देखील न्यायालयाने यावेळी विचारला.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारांना फटकारले आणि म्हटले की, ते एबीसी नियम लागू करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. यासोबतच खंडपीठाने पुढे म्हटले की, आम्ही केंद्र आणि राज्य सरकारांना जबाबदार धरणार आहोत. हा मुद्दा कायमचा सुरू आहे. तुम्ही स्वतः नमूद केले आहे की, संसद १९५० पासून यावर विचार करत आहे. केंद्र आणि राज्य सरकारांच्या हलगर्जीपणामुळे ही समस्या १००० पटीने वाढली आहे. हे सर्व राज्य सरकारांचे पूर्णपणे अपयश आहे. कुत्र्यांच्या चाव्यामुळे जीव गमावणाऱ्या प्रत्येक पुरुष, महिला आणि मुलासाठी आम्ही जबाबदार सरकारवर मोठा दंड आणि भरपाई आकारू, असे म्हणत मोठा निर्णय दिला आहे

## वाहनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ

**नवी दिल्ली :** जीएसटी सुधारणांमुळे किमती कमी झाल्यामुळे सणासुदीच्या हंगामात विक्रीत चांगली वाढ झाली, त्यामुळे २०२५ मध्ये कंपन्यांकडून डीलर्सकडे प्रवासी वाहनांची विक्री एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक झाली, असे उद्योग संघटना सियामने मंगळवारी एका निवेदनाद्वारे सांगितले. एकूण प्रवासी वाहनांची घाऊक विक्री गेल्या वर्षीच्या तुलनेत ५ टक्क्यांनी वाढून ४४,८९,७१७ लाखांवर पोहोचली, जी २०२४ कॅलेंडर वर्षात ४२,७४,७९३ इतकी होती.

## अमेरिकेने रद्द केले १ लाख व्हिसा; भारतीयांना फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने २०२५ मध्ये भारतासह जगभरातील अनेक देशांना व्हिसांबाबत मोठा धक्का दिला आहे. २०२५ मध्ये अमेरिकन सरकारने १,००,००० हून अधिक व्हिसा रद्द केले, ज्यात ८,००० विद्यार्थी व्हिसा समाविष्ट आहेत. २०२५ मध्ये अमेरिकन सरकारने २०२४ च्या तुलनेत दुप्पट म्हणजे ४०,००० व्हिसा रद्द केले. इमिग्रेशन धोरणांतर्गत चौकशीनंतर अमेरिकन सरकारने हा निर्णय घेतला, या निर्णयामुळे भारतीयांना सर्वाधिक फटका बसला आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने सोशल मीडियावर एक निवेदन जारी करत ही माहिती दिली आहे. अध्यक्ष ट्रम्प यांच्या निर्देशानुसार, इमिग्रेशन धोरणांतर्गत जारी केलेल्या व्हिसांच्या तपासणीत १००,००० हून अधिक व्हिसांमध्ये अनियमितता आढळून आली, जी रद्द करण्यात आली आहेत. अमेरिकेत आगमनानंतर गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींना जारी केलेले २,५०० विशेष व्हिसा यांचा समावेश आहे. अमेरिकेला सुरक्षित ठेवण्यासाठी परदेशी गुन्हेगारांना देशातून हाकलून लावण्यात आले आहे.

## पेमेंटमध्ये वाढत्या विलंबामुळे किमतीत मोठी घसरण

# इराणमधील अशांततेचा बासमतीला फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराणमधील नागरी अशांततेचा परिणाम भारताच्या बासमती तांदळाच्या निर्यातीवर होऊ लागला आहे , ज्यामुळे देशांतर्गत किमतींमध्ये मोठी घसरण झाली आहे, कारण निर्यातदारांना पेमेंटमध्ये विलंब होत आहे आणि अनिश्चितता वाढत आहे, असे एका उद्योग संघटनेने मंगळवारी सांगितले.

इंडियन राईस एक्सपोर्टर्स फेडरेशनने निर्यातदारांना इराणी करारांवरील जोखमींचे पुनर्मूल्यांकन करण्याचे आणि सुरक्षित पेमेंट यंत्रणा स्वीकारण्याचे आवाहन केले, इराणी बाजारपेठेसाठी असलेल्या इन्व्हेंटरीजचा अतिरेकी वापर करण्याविरुद्ध इशारा दिला.

व्यापार आकडेवारीनुसार, भारताने २०२५-२६ आर्थिक वर्षाच्या एप्रिल-नोव्हेंबर दरम्यान इराणला ४६८.१० अमेरिकन डॉलर्स किमतीचा बासमती तांदूळ निर्यात केला, जो एकूण ५.९९ लाख टन होता. इराण हे भारतातील बासमती तांदळाचे सर्वोच्च निर्यात केंद्र आहे, परंतु चालू आर्थिक वर्षात सध्याच्या अस्थिरतेमुळे ऑर्डर प्रवाह, पेमेंट चक्र आणि शिपमेंट वेळापत्रकांवर ताण वाढत आहे. त्याचा परिणाम आता देशांतर्गत बाजारपेठांमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे.

गेल्या आठवड्यातच, प्रमुख बासमती वाणांच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे, ज्यामुळे खरेदीदारांचा संकोच, करारांना विलंब आणि निर्यातदारांमध्ये वाढलेली जोखीम धारणा दिसून येते. बासमती तांदळाच्या जाती ११२१ चा देशांतर्गत भाव गेल्या आठवड्यात ८५ रुपये प्रति किलोवरून ८० रुपये प्रति किलोवर आला आहे, तर १५०९ आणि १७१८ या जाती ७० रुपये प्रति किलोवरून ६५ रुपये प्रति किलोवर आल्या आहेत.

"इराण हा ऐतिहासिकदृष्ट्या भारतीय बासमतीसाठी एक आधारस्तंभ बाजारपेठ आहे. तथापि, सध्याच्या अंतर्गत गोंधळामुळे व्यापार मार्ग विस्कळीत झाले आहेत, देयक मंदावले आहेत आणि खरेदीदारांचा विश्वास कमी झाला आहे," असे आयआरईएफचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रेम गर्ग यांनी एका निवेदनात म्हटले आहे. ते म्हणाले की निर्यातदारांनी विशेषतः क्रेडिट एक्सपोजर आणि शिपमेंट टाइमलाइनच्या बाबतीत अधिक सावधगिरी बाळगली पाहिजे. आयातदारांनी विद्यमान वचनबद्धता पूर्ण करण्यास आणि भारताला पैसे पाठवण्यास असमर्थता दर्शविली आहे, ज्यामुळे निर्यातदारांमध्ये अनिश्चितता निर्माण झाली आहे, असे फेडरेशनने म्हटले आहे.

आयआरईएफने एक सल्लागार जारी केला आहे आणि इराणला जाणाऱ्या निर्यातीतील दीर्घकाळापर्यंत मंदी टाळण्यासाठी पश्चिम आशिया, आफ्रिका आणि युरोपमधील पर्यायी बाजारपेठांमध्ये विविधता आणण्याचे आवाहन भागधारकांना केले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलिकडच्या वक्तव्यांबद्दलही फेडरेशनने चिंता व्यक्त केली, ज्यात असे म्हटले आहे की इराणशी व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांना २५ टक्के कर आकारला जाऊ शकतो. आयआरईएफने स्पष्ट केले की अमेरिकेला भारतीय तांदळाच्या निर्यातीवर आधीच ५० टक्के कर आकारला जात आहे, जो पूर्वी १० टक्क्यांवरून वाढला होता. असे असूनही, अमेरिकेला होणारी भारतीय तांदळाची निर्यात स्थिर राहिली आहे. भारताने एप्रिल-नोव्हेंबर २०२५-२६ या कालावधीत अमेरिकेला २,४०,५१८ टन बासमती आणि बिगर-बासमती तांदूळ निर्यात केला, जो संपूर्ण २०२४-२५ या आर्थिक वर्षात २,३५,५५४ टन होता. अमेरिका हा जागतिक स्तरावर भारतीय तांदळासाठी १० वा सर्वात मोठा आणि बासमत तांदळासाठी चौथा सर्वात मोठा बाजार आहे.